क्र. कामगार/ब/ककनि/आम/२६४८६
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
कामगार औद्योगिक संबंध विभाग,
४ था मजला, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
दिनांक : २२/०६/२००७.

## परिपत्रक

विषयः स्थानिक पातळीवरील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटना प्रतिनिधी म्हणून फक्त महावितरण कंपनीत काम करणा-या कर्मचारी / अधिका-यास बैठकीसाठी बोलविणेबाबत.

**************

तदर्थ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कार्यरत कर्मचारी संघटनांना कर्मचा-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विभाग / मंडल / परिमंडळ स्तरावर व्यवस्थापनाबरोबर चर्चा करण्यासाठी बोलविले जात होते. मंडळाच्या पुनर्रचनेनंतर महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन कंपन्या अस्तित्वात आल्याअसून कंपनीत कार्यरत असणा-या कर्मचारी संघटनांनी कंपनीनिहाय कामगाराचे प्रतिनिधीत्वकरणे आवश्यक आहे. याप्रमाणे महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन कंपनीतील कामगार संघटनांनी संघटना पातळीवर कंपनीनिहाय संघटनांची कार्यकारिणी नामनिर्देशित केली आहे. परंतु काही संघटनांचे पदाधिकारी / प्रतिनिधी हे प्रत्यक्षात महापारेषण / महानिर्मितीमध्ये मध्ये कार्यरत असताना ते महावितरण कंपनीतील कर्मचारी संघटनाचे प्रतिनिधीत्व करतात.

असे निदर्शनास आले आहे की, महापारेषण / महानिर्मिती या कंपनीत काम करणारे संघटना प्रतिनिधी / पदाधिकारी महावितरण कंपनीच्या व्यवस्थापनाबरोबर कामगारांचे प्रश्न मांडताना अधिका-यांशी सौजन्यपूर्वक वर्तन न ठेवता त्यांच्याबरोबर उध्दटपणे वागतात व अप्रस्तृत भाषा वापरुन त्यांचा अवमान करतात. कामगार संघटना प्रतिनिधी / पदाधिका-यांच्या अशा प्रकारच्या वर्तणूकीमुळे कार्यालयीन शिष्टचाराचा भंग होतो व औद्योगिकसंबंधात बाधा निर्माण होते व पर्यायाने कंपनीच्या दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होतो. तसेच अशा प्रतिनिधी / पदाधिका-यांच्या उपस्थितीसंबंधी संबंधित कंपनी व्यवस्थापनाला, कामावर असून नियमाप्रमाणे भत्ते देण्याबाबत कळविणेही तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे होते.

मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांच्या मंजुरीनुसार आपणांस कळविण्यात येते की, महावितरण कंपनीमधील कामगार संघटनांचे प्रतिनिधी / पदाधिकारी हे महावितरण कंपनीत कार्यरत असणे आवश्यक आहे. अशा संघटना पदाधिकारी / प्रतिनिधींनी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी महावितरण कंपनीतील विभाग / मंडल / परिमंडळ स्तरावर कर्मचा-यांचे प्रतिनिधीत्व करावे, जेणे करून कंपनी अंतर्गत व्यवस्थापन व कर्मचारी संघटना यांच्यामध्ये सलोख्याचे व सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित होऊन कार्यालयीन शिष्टाचाराचे पालन होईल.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

Grievance meeting

प्रति :

प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना (कार्यकारी अभियंता पर्यंत)

(69-A)

E:\Backup Of Meena\D Drive\Meena\on\sathanik prasan.doc